# प्रकरण चौथे

## विद्रोही तुकाराम या ग्रंथाच्या निर्मिती मागची लेखकाने दिलेली भूमिका

संत तुकाराम आजपर्यंत अनेक प्रकारचे लेखन झाले. भाषण भजन किर्तन इत्यादी माध्यमातून तुकारामांचे चरित्र व कार्य समाजापुढे मांडले गेले, हे दर्शन वरवरचे व अपुरे आहे. असे सर्वच विचारवंताना वाटते त्यांच्या खऱ्या व्यक्तित्वाची ओळख डॉ. आ. ह. साळुंखे यांनी विद्रोही तुकाराम या ग्रंथाद्वारे करून दिली आहे. तुकारामांचे परीर्तनवादी विचार, उच्चवर्णीयांच्या अतिक्रमणाचा केलेला विचार याचा सांगोपांग अभ्यास या पुस्तकामुळे करावयास मिळतो त्याचा घेतलेला परामर्श.

# प्रकरण चौथे

## विद्रोही तुकाराम या ग्रंथाच्या निर्मिती मागची लेखकाने दिलेली भूमिका

वयाच्या विशीत असलेल्या तुकारामांना भांबनाथाच्या डोंगरावर साक्षात्कार झाला हे खरे आहे पण हा साक्षात्कार आध्यात्मिक स्वरूपाचा नव्हता तर सामाजिक न्यायाच्या स्वरूपाचा होता या साक्षात्कारानंतर त्यांनी पहिले पाउल उचलले ते वडिलांनी लोकांना दिलेल्या कर्जाची कागदपत्रे इंद्रायणीच्या डोहात बुडवण्याचे होय. त्यांनी हे कृत्य संसाराला विटल्यामुळे नव्हे तर संसाराला चिकटणारा शोषणाचा घटक छाटून टाकण्यासाठी केले. अन्नान दशा झाल्युळे ते इश्वर भक्तीकडे वळले हे काही लेखकांचे म्हणणेही खरे नव्हे, कारण मी जनार्दनाकडे आलो ते काही अन्नाला महाग झालो म्हणून नव्हे असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे मी वेदांचा अंकित नाही भेदभाव सांगणारा वेदांचा भाग गाळून उरलेला भाग मी प्रमाण मानतो सर्वांच्या ठिकाणी समत्व पाहणे हे ब्रम्हाचे स्वरूप न जाणणारा पंडित दुराचारी होय अशी भूमिका त्याने घेतली सर्वांचे चर्म मांस समान असताना भेदभाव कशाच्या आधारे करायचा ? वाण्याच्या दुकानातून गुळ घ्यायचा असेल तर त्याची जात व कुळ कशाला विचारायाचे ? गावचा मोकाशी हलक्या जातीतील असला तर त्या कारणाने त्याची आज्ञा मानायची नाही काय? असे प्रश्न त्यांनी विचारले महार व्यक्तिला स्पर्श झाल्यामुळे ज्याला राग येतो तो काही खरा ब्रम्हज्ञानी ब्राम्हण नव्हे त्याने देहान्त प्रायश्चित केले तरी त्याचे पाप फिटत नाही असे त्यांनी म्हटले.

त्यांनी सोवळया ओवळयाच्या परंपरागत कल्पना नाकारल्या आणि जो परद्रव्य व परनारी यांच्या बाबतीत सोवळा असतो तोच खरा सोवळा अशी नैतिक कसोटी सांगितले जो जानवे व शेंडी यांचेबरोबर संबंध तोडेल त्याला कसलीही बाधा होणार नाही असे म्हटले.

विधीनिषेध, यज्ञ, श्राद्ध, पूजा भविष्यकथन, शुभाशुभ नवस कौल योग, समाधी उपवास तीर्थयात्रा वनवास गुहेतील ध्यान, संन्यास, मोक्ष यांचे परंपरागत स्वरूप नाकारून त्यांच्यापेक्षा शुद्ध भावनांचे व शुद्ध आचरण यांना खरे महत्व असल्याने

सांगितले त्यांचा इश्वर पारलौकिक मुल्यांवर नव्हे तर माणुसकीवर आधारलेला होता रंजल्या गांजल्या लोकांना जो आपुले म्हणतो तो खरा साधू, आणि देव अशा साधुजवळ राहतो असे त्यांनी म्हटले. देवपुजा करताना असे संत घरी आले असता देवाना बाजुला सारून या संताची पुजा करावी असे त्यांनी लोकांना सांगितले.

थोडक्यात म्हणजे समाजव्यावस्थेला न्यायाचे अधिष्ठान देवून तिचे निर्मलीकरण करण्यासाठी रात्रंदिवस युद्ध केले आणि काही तत्वांसांठी काही मुल्यांसाठी स्वतःच्या हातांनी एक प्रबल समाजाच्या वैराचा ज्वालामुखी स्वतःच्या उरावर ओढवून घेतला! अशा तुकारामाचा चरित्राचा कार्याचा व काव्याचा समग्र सर्वांगीण परीपूर्ण आढावा घेणे वा मुल्यमापन करणे हे विद्रोही तुकारामा या पुस्तकाचे स्वरूप नाही. लेखक ज्या दुष्टीने तुकारामांच्या जीवनाकडे पाहतात त्या दुष्टीने तुकारामांच्या जीवनाचे ओझरते स्वरूप या पुस्तकांत मांडले आहे.

तुकारामाच्या अत्यंत महत्वपूर्ण अशा शेकडो अभंगाना लेखकाने या पुस्तकात स्पर्शही केला नाही. पुस्तकात अत्यावश्यक वाटेल तेथे इतर लेखकांच्या मतांचे विवेचन असले तरी विशिष्ठ मतांचे खंडण मंडण करणे हेही या पुस्तकाचे स्वरूप व उदि्दष्ट नाही तुकारामांच्या अभंगातून व्यक्त होणारी त्यांची जीवनविषयक भूमिका संक्षेपाने मांडणे हे उदि्दष्ट डोळयासमोर ठेवून हे सर्व लेखन केले आहे.

असे करताना तुकारामांच्या नावावर घुसडण्यात आलेल्या अभंगाची दखल घेतली नाही वा त्यांचे खंडणही केले नाही. तुकारामांच्या अभंगासमध्ये प्रक्षेप झाले होते याची काही चर्चा मला यात केलेली आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतीक जीवनात संताची शिकवण ही महत्वाची आहे त्यांनी महाराष्ट्राचे जीवनच बदलून टाकले प्रत्येक संतास स्वतःचे काही वैशिष्ठ आहेच त्या त्या वेळी संताना समाजातील प्रस्थापित वर्गाची आडकाठी आली. या सर्वात संतश्रेष्ठ तुकारांमाना ही विरोध झाला.

तुकारामानी प्रस्थापित समाजामध्ये असणाऱ्या विषमतेविरूद्ध व समतेकरिता लढा दिला.

वरिष्ठ वर्गाविरूद्ध बंडाचा झेंडा उभारला या बंडखोर संताची बाजू विद्रोही तुकाराम या पुस्तकांत लेखकाने मांडली आहे.

विद्रोही तुकाराम या आ. ह. साळुंखे पुस्तकात तुकारामाच्या चरित्राचा सखोल व सत्यतेच्या कसोटीवर आढावा घेतला आहे मुलगामी व स्वतंत्र तर्कनिष्ठ विचार मांडण्याच सामर्थ्य यातून दिसते. तुकारामानी हे मानवी जीवनातील नाना प्रकारच्या उत्कट अनुभवानां अत्यंत आशयधन शब्दात साकार करणारा एक शब्दार्थप्रभु प्रतिभावंत धर्माला नीतीचे आणि निष्कपट भावनेचे अधिष्ठान देणारा एक आचारशील भक्त अक्षरशः सर्वस्व पणाला लावून सांस्कृतिक व सामाजिक अन्यायच्या विरोधात दंड थोपटणारा एक आव्हानवीर योद्धा, प्रतिभावंत, भक्त आणि योद्धा या तिन्ही भूमिकांचा एकत्र मिलाफ झालेला महापुरूष कवि तुकाराम, संत तुकाराम, विद्रोही तुकाराम.

तुकारामांच्या व्यक्तित्वात असे काय होते की ज्याच्यामुळे येथील लोकांच्या ह्यदयातून त्यांच्यासाठी इतके प्रेम ओसंडून वाहू लागले.

लेखन भजन किर्तन इ. माध्यमातून तुकारामांचे चरित्र व कार्य समाजापुढे मांडण्याचे काम आजपर्यंत असंख्य व्यक्तींनी केले आहे. या व्यक्तींनी वरील प्रश्णाचे उत्तर अचूकपणे द्यावे अशा प्रकारची अपेक्षा लोकांनी बाळगणे हेही स्वाभाविक होय. प्रत्यक्षात मात्र काही सन्मान्य अपवाद वगळता इतरांनी या प्रश्नांचे उत्तर नीट दिलेले नाही. त्यांनी त्यांचे खरेखुरे व्यक्तित्व आपल्यापुढे मांडलेले नाही एवढेच नव्हे तर काही वेळा ते विपर्यस्त स्वरूपातही मांडले आहे अशी आ. ह. साळुंखे यांची खंत आहे. अशा परिस्थितीत तुकारामांचे व्यक्तिमत्व नव्याने जाणून घेण्यासाठी लेखकाच मन काही वर्षे तडफडत होते या तडफडण्याचे प्रत्यक्ष फळ म्हणजे विद्रोही तुकाराम हे पुस्तक होय.

तुकारामांच्या बहुतेक चरित्रकारांनी आपल्यापुढे उभी केलेली त्यांची प्रतिमा त्यांच्या मूळ व्यक्तित्वाशी सुसंगत नाही असे लेखकाला सतत वाटत आले आहे. तुकाराम म्हणजे दिवाळे निघाल्यामुळे असहाय होवून इश्वराच्या भक्तीकडे वळलेला धीटपणे

संसार करू न शकलेला सदैव टाळ कुटत बसलेला व्यवहारशून्य, भोळा भाबडा, किंबहुना भोळसट संत असे काहीसे त्यांचे चित्र अनेकदा आपल्यासमोर उभे करण्यात आले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की समाज मनावर प्रभाव गाजवत असेल्या एका उद्दाम, अहंकारी आणि धर्माच्या नावावर अनीतीच्या बाजार मांडणा–या धर्मसत्तेला कडवे आव्हान देणारा हा संत म्हणजे एक महान लढवय्या होता. अंतरंगाने किडक्या, परंतु बहिरंगाने अत्यंत प्रबळ व मजभूत असलेल्या एका समाजव्यवस्थेच्या मुळाशी निर्भयपणे सुरूंग लावण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. एका अनैतिक व्यवस्थेविरूध्द प्रचंड विद्रोह केला अशा बहादूर व्यक्तिला एका भोळसट व असाहय व्यक्तित्वाच्या स्वरूपात रेखाटणे म्हणजे एखाद्या सिंहाचे चित्र शेळीच्या स्वरूपात काढणे होय किंवा एखाद्या धगधगत्या निखा–याचे वर्णन थंडगार कोळसा म्हणून करणे होय. हे उघड उघड विकृतीकरण आहे आणि तुकारामांविषयी लिहणाऱ्या बहुसंख्य लेखकांनी अशा प्रकारचे विकृतीकरण केले आहे ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे म्हणूनच तुकारामांचे मूळ व्यक्तित्व नेमकेपणाने समजून देण्यासाठी लेखकाने या पुस्तकाद्वारे एक प्रयत्न केला आहे.

तुकारामाची प्रतिमा आपल्यासमोर नीट आलेली नाही याचा एक निःसंदिग्ध पुरावा म्हणून नमुन्यादाखल त्यांच्या आयुष्यातील एका घटनेची लेखकाने प्रास्ताविक प्रकरणात चर्चा केली आहे. तुकारामांनी इंद्रायणी नदीत कर्जखते बुडवीली ही अत्यंत क्रांतीकारक अशी घटना होय विशेष म्हणजे इतकी महत्वाची घटना बहुसंख्य लोकांना माहीत नाही.

तुकारांमाचे चरित्र लिहणाऱ्या महीपतीने या संदर्भात दिलेली माहीती अशी तुकारामांनी देहुजवळील भांबनाथ पर्वतावर सात दिवस शोध घेतल्यानंतर ते त्या पर्वतावर आढळले मग कान्होबा त्यांना देहकुडे घेवुन आले. परतताना तुकाराम इंद्रायणीच्या डोहाजवळ बसले सुर्योदयाच्या वेळी स्नान करून त्या दोघांनी सात दिवसाचे पारणे तेथेच सोडले. त्यांच्या वडिलांनी लोकांना कर्जे दिलेली होती त्या विषयीची कर्जखते तुकोबांनी कान्होबांना घरातून आणायला लावली. मी. ही कर्ज खते

इंद्रायणीत बुडवतो असे ते कान्होंबां म्हणाले " तुम्ही विरक्त आहात पण माझ्यामागे प्रंपच आहे. " असे म्हणून कान्होंबांनी त्यास विरोध केला तुम्ही वडील आहात आम्ही, तुम्हाला काही सांगणे योग्य नव्हे, पण ही कर्जखते बुडविली असता लेकरे काय करतील असेही कान्होबा त्यांना म्हणाले. कान्होबाचा मनोदय जाणून तुकारामांची एक मार्ग काढला त्यांनी कागदपत्रांचे दोन समान भाग केले त्यातील एक भाग कान्होबांना दिला आणि आपल्या वाटणीला आलेली कागदपत्रे इंद्रायणीच्या पाण्यात बुडविली. या घटनेची पार्श्वभूमी व स्वरूप तिचे तुकारामांच्या जीवनातील स्थान व महत्व तिचा नेमका अन्वयार्थ विविध लेखकांनी तिच्याविषयीचे केलेले लेखन इ. चे लेखकाने या पुस्तकात थोडेसे विवेचन केले आहे.

तुकारामाच्या घरात अनेक पिंढयापासून सावकारी चालू होती गावातील अनेक लोकांकडून त्यांच्या वडिलांनी दिलेल्या कर्जाच्या रकमा येणे होत्या त्यांच्या कुटुंबात महाजनकीही होती म्हणजे व्यापाऱ्यांच्या वजननामापांवर नियंत्रण ठेवण्याचे काम त्यांच्याकडे होत. त्यांच्या कुटूंबात व्यापार चांगला होता शिवाय शेतीचे उत्पन्न ही चांगले होते. याचा अर्थ तुकाराम आर्थिकदृष्टया अत्यंत सुरक्षित व सुस्थित होते त्यांनी कर्जखते इंद्रायणीस बुडविली तेव्हा ते ऐन विशीत होते त्यांच्या अभंग लेखनाची आणि धार्मिक सामाजिक क्षेत्रातील कार्याची सुरूवात याचवेळी झाली. आणि त्यांचे हे काम पुढे वीस वर्षे चालु राहीले अवघ्या वीस एकवीस वर्षाचा संपन्न परीस्थीतील हा तरूण एके दिवशी भांबनाथाच्या डोंगरावर गेला आणि सात दिवस तेथेच राहीला या काळात त्याने काही गंभीर चिंतन केले काही आत्मपरीक्षण काही सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण केले. संपूर्ण आयुष्याला कलाटणी देणारे काही निर्णय घेतले. त्यामुळे परत येताना घरी पोचण्यापूर्वी इंद्रायणीच्या डोहाजवळ थांबून त्यांनी कान्होबांना कर्जखते आणायला लावली ती कर्जखाते बुडून त्यांनी संन्यास घेतला नाही ती कर्ज बुडविल्यानंतर ते घरी परतले संसारात परतले आणि अखेरपर्यंत संसारात राहीले पण नुसता संसार करीत राहीले नाहीत. कुटुंबाचा संसार करता करता समाजाचाही विशिष्ठ संसार करत राहीले.

सिंहाचे चित्रण शेळीच्या स्वरूपात

वर वर पाहीले तर कर्जखाते बुडविण्याची घटना अत्यंत असाधारण आहे हे कुणाच्याही घ्यानात येवू शकते संपन्न परिवारातील व्यक्ती अशा प्रकारचे पाऊल क्वचितच उचलतात. संसाराची जबाबदारी अंगावर येवून पडल्यानंतर तुकारामांनी उचलेलेले पहिले महत्वाचे पाऊल म्हणून या घटनेचा निर्देश होतो एका दृष्टीने त्यांच्या जीवीत कार्याचा प्रारंभबिदूच आहे असे म्हणता येईल. त्यांनी पुढच्या वीस वर्षात जी काही मुल्ये मांडली त्या सगळयांचे सार या घटनेन आहे ही कृती एक श्रेष्ठ बीज असून तेथे पुढे तुकारामांच्या जीवनकार्याच्या रूपाने अंकुरले, मोहरले, फुलले, बहरले आणि दरवळले. आपण या कृतीमध्ये त्यांच्या निर्मळ जीवनाचे प्रतिबिंब स्वच्छपणे पाहू शकतो. ही कृती हा त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू असून त्याच्या भोवतीच्या परीघात त्यांचे जीवन विस्तारले इतके या कृतीचे मोल आहे या घटनेत तुकारामांचे तुकारामात्व

तुकारामांच्या आयुष्यात ही घटना घडली नसती तर आज आपल्यापुढे असलेले तुकाराम आपल्याला बहुधा मिळालेच नसते तुकारामांचे तुकारामत्व या घटनेतून जन्माला आले असल्यामुळे ही घटना वगळली ती तुकारामांचे चरित्र आपल्या हाताला लागू शकत नाही. जे ही घटना जाणून घेणार नाहीत त्यांना तुकारामांच्या चरित्रात प्रवेश करण्याचा अधिकार नाही. ही घटना तुकारामांच्या चरित्रामधील चमत्कार नसलेला चमत्कार आहे.

सृष्टीचे कारणकार्य नियम मोडल्याची वर्णने ज्यामध्ये येतात ते चमत्कार खोटे असतात बनावट असतात फसवणूक करणारे अवास्तव असतात. याउलट माणसाच्या अंतःकरणातील आणि युगायुगापासून केव्हातरीच घडणारे अशा प्रकारचे चमत्कार मात्र आपल्या आदराचा विषय होतात पूजेचा विषय होतात माणसाने स्वतः अशा प्रकारचे चमत्कार करण्यासाठी उतावीळ व्हावे आणि दुसऱ्या कोणी अशा प्रकारचे चमत्कार केले तर त्याच्यापुढे नतमस्तक व्हावे त्यांना आपल्या श्रद्धेचा विषय बनवावे

अशी त्या चमत्काराची उंची असते.

त्यांची ही कृती महाकाव्याला जन्म देणारी आहे एका महान तत्वज्ञानाला प्रसवणारी आहे एका श्रेष्ठ जीवन दर्शनाला प्रकाशित करणारी आहे मानव जातीच्या इतिहासात अशा प्रकारच्या तेजस्वी आशय धारण करणारी घटना दुर्लभच नव्हे तर अतिदुर्लभ म्हणावी लागेल.

आणि म्हणूनच तुकारामांनी कर्जखाते इंद्रायणी नदीत बुडविले या घटनेचा अर्थ आणि पर्यायाने तुकारामांचे जीवीत कार्याचा अर्थ समजून घेण्यासाठी आपण आपली अवधी ज्ञानेद्रिये एकाग्रपणे या घटनेवर केंद्रीत करायला हवीत.

हया घटनेची उपेक्षा इंद्रायणीस कर्जखते बुडविणे ही तुकारामांच्या आयुष्यातील एक विलक्षण आणि असाधारण घटना आहे पण या घटनेची मराठी जगताने उपेक्षा केली आहे ही बाब तितकीच विलक्षण असाधारण व धक्कादायक आहे.

तुकारामांचे जीवनातील खरे खोटे भलते सलते चमत्कार तोंडपाठ करणाऱ्या मराठी विश्वाने या अस्सल आणि अमोल कृतीची फारशी दखल घेतली नाही हे पाहीले की लेखकाचे मन अक्षरशाः कळकळून उठते अगदी कासावीस होवून जाते.

गेल्या शंभर वर्षांतील शालेय पुस्तकांचे समीक्षण केले असता जो समाज आपल्या मुलांच्या अभ्यासक्रमातून तुकारामासारख्या महापुरूषांच्या चरित्रातील अत्यंत क्रांतीकारक असी घटना वगळतो तो समाज आपल्या भावी पिढयांना कोणता संदेश देवू शकेल बरे. ? एखाद्या घटनेचा मनावर संस्कार होण्याच्या दृष्टीने ती घटना लहापणीची अभ्यासक्रमात वाचायला मिळणे हा अत्यंत महत्वाचा मार्ग होय तुकारामाच्या आयुष्यातील या अत्यंत महत्वपूर्ण घटनेच्या बाबतीत हा मार्ग पूर्णपणे बंद असल्यामुळे ही घटना अभ्यासकमातून यायला हवी यापूर्वी अभ्यासक्रमातून का आली नाही याचा समाशास्त्रीय व मानसशास्त्रीय अंगानी शोधही घ्यावला हवा ही घटना कथा किर्तनातून सांगितली जात नाही. त्यांच्या जीवनात न घडलेले चमत्कार पुन्हा पुन्हा आळवून आळवून सांगितले जातात पण ही अत्यंत वास्तव

घटना मात्र उपेक्षित राहते. अनेक किर्तनकारांनाही घटना ठाऊक नसावी. असे लेखकाला वाटते. तुकारामांवर अनेक लेख व पुस्तके लिहणा–या लेखकानाही ही घटना माहीत नाही. ही घटना अभ्यासग्रंथ, चरित्र ग्रंथ इ. वाङ्‌मयातून निर्दिष्टच करण्यात आली नसेल तर वाचकापर्यंत पोहचण्यांची शक्यता नाही हे उघड ज्ञानप्रसाराची बहुतेक माध्यमें या घटनेविषयी मौन बाळगत असतील तर ती घटना बहुसंख्य लोकांच्या दृष्टीने अज्ञान राहणे अगदी स्वाभाविक आहे तात्पर्य ज्यांच्यापर्यंत ही घटना कोणत्याही मार्गोने पोहचली नाही त्यांच्या अज्ञानाबद्दल त्यांना दोष देण्याला अर्थ नाही

तुकारामांना कर्जाऊ रक्कम ज्यांच्याकडून येणे होती त्याच्यापैकी बहुतेक लोक सामाजिक व आर्थिक दृष्टया सामान्य थरातील असतील हे अगदी उघड आहे कर्जाच्या ओझ्या खाली दबलेली माणसे किती व कशी लाचार असतात असहाय बनलेली असतात याचा अनुभव आपण आजच्या समाजातही घेत असतो सावकाराने व्याजाचा दर जबर लावला. हिशोबातही फसवा फसवी केली अपमान केला. वसुली साठी जबरदस्ती केली, घरातील वस्तु उचलून नेल्या दमदाटी केली गुंड पाठवले आणि मारहाणी केली तरी ही बिचारी माणसे प्रतिकार करू शकत नाहीत. सर्व काही निमुटपणे सोसतात. आता अशाच प्रकारच्या लोकाकडून कर्ज वसूल करण्याचा आत्मविश्वास तुकारामाकडे नसेल आणि त्यामुळे एखाद्या विवंचनेतून मुक्त व्हायचे असेल तर असे ठरवून त्यांनी कर्जखते बुडवली असती तर तुकाराम या दुबळया लोकांपेक्षाही अधिक दुबळा होता असा याचा अर्थ होतो व हे चुकीचे आहे. तुकाराम हे एक डोळस आणि संवेदनशील गृहस्थ होते ते डोळस असल्यामुळे आपल्या अवती भोवतीच्या सामाजिक परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण करीत होते त्यामुळे आपल्या समाज व्यवस्थेतील त्रुटी आणि उणीवा त्यांना जाणवू लागल्या होत्या धर्माच्या नावाखाली होणारा अन्याय शोषण आणि नितीची विटंबना त्यांच्या ध्यानात आली होती. बळवंताची प्रस्थापिनाची मग्रुरी आणि गोरगरीबांची दुर्दशा त्यांच्या लक्षात आली होती.

डोळस असल्यामुळे हे सगळे त्यांनी अचूकपणे हेरले तसेच ते संवेदनशील असल्यामुळे या सगळयाच्या विरोधात एका उत्कट विद्रोहाची भावना त्यांच्या मनात उफाळून आली हे सगळे बदलले पाहीजे असे त्यांना वाटू लागले. आपल्या व्यवस्थेचे शुध्दीकरण केले पाहीजे असे त्यांच्या मनाने घेतले. आपल्या समाजात घुसलेला हिणकस भाग छाटून काढला पाहीजे असा त्यांनी निश्चय केला. आपली समाजव्यवस्था कुटील बनलेली असून तिच्यामध्ये सामान्य माणसे फसवली जात आहे. चिरडली भरडली जात आहे हे माझ्या डोळयांनी पाहवत नाही म्हणून माझ्या मनात कळवळा येत आहे हे आर्त उद्‌गार त्यांनी काढले. ते त्यामुळेच होय. त्यांच्या या सर्व चिंतनााचे सार सांगायचे झाले तर समाजातील नाठाळांना वटणीवर आणावे रंजल्या गांजल्यांना धीर दयावा आधार दयावा त्यांचे अश्रू पुसावेत ही त्यांची जीवननिष्ठा बनली. ही जीवननिष्ठा हाच त्यांनी भांबनाथाच्या डोंगरावर सात दिवस केलेल्या चिंतनाचा विषय होता. यात शंका नाही या चिंतनात त्यांनी आपल्या पुढच्या आयुष्याची वाट निश्चित केली. तेथून पूढे काय बोलायचे आणि कसे वागायचे ते पक्के केले या सर्व चिंतनाचे सार व गाभा हाच त्यांना झालेला साक्षात्कार होय. हा साक्षात्काराच त्यांच्या भावी जीवनातील आचार विचारात प्रतिबिंबीत झाला जसे बोलायचे तसे वागायचे, लोकाना जसे वागायला सांगायचे तसे सांगण्यापूर्वी स्वतः वागवून दाखवायचे, ज्या गोष्टी करू नयेत असा इतरांना उपदेश करायचा त्या गोष्टी आपण करायंच्या नाहीत. हे तुकारांमाच्या व्यक्तित्वाचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ठ होय. बोलल्या सारखे वागणे ही त्यांच्या दृष्टीने संतत्वाची कसोटी होती. तुकारामांनी सात दिवसाच्या चिंतनात ही संतत्वाची कसोटी स्वतःच्या व्यक्तित्वाला कठोरपणे लावली अर्थात अशा प्रकारचा विचार ते खुप आधीपासून करत असले पाहीजेत. या सात दिवसात या विचाराने परमोत्कर्ष गाठला, एवढाच त्याचा अर्थ होय. निर्मळ निष्कपट शुद्ध जीवनाचे काही निकष त्यांनी निश्चित केले आणि ते काटेकोरपणे आपल्या स्वतःच्या जीवनाला लावायला सुरूवात केली स्वतःच्या जीवनाला अशिव, अनिष्ठ असेल ते अलग करण्याचा काढून फेकण्याचा त्यांनी निर्धार

केला या प्रक्रियेतून जाताना आपली वडिलार्जित सावकारी न्यायाच्या आपणच तयार केलेल्या कसोटीवर टिकत नसल्याचे त्यांना जाणवले गोरगरीब दुःखीकष्टी रंजल्या गांजल्या लोकांचे अश्रू पुसणे हे आपले कर्तव्य आहे ते करायचे सोडून त्यांच्याकडून कर्जे जबरदस्तीने वसूल करणे म्हणजे आधीच मोडकळीत आलेले संसार पूर्णपणे मोडीत काढणे वा उद्धस्त करणे होय. असे करणे हे माणुसकीच्या दृष्टीने लाजिरवाणे आहे. अशी त्यांची धारणा बनली ते धनाचे द्वेष्टे नव्हते, पण धन हे उत्तम व्यवहार करूनच मिळवावे असा त्यांचा आग्रह होता. आपल्या अभंगातून आपली ही भूमीका त्यांनी पून्हा पून्हा मांडल्याचे आढळते धन मिळवावे पण ते निर्दोष निष्कलंक मार्गानी मिळवावे. लबाडी फसवणूक पिळवणूक करून मिळवू नये. अशी त्यांची भावना होती. तुकारामांकडे लोकांना कर्जे दिल्याची कागदपत्रे असल्यामुळे ती कर्जे वसूल करणे तांत्रिक दृष्टया कायदेशीर ठरलेही असते. परंतु तुकारामांनी अशा प्रकारच्या तांत्रिकतेला आपल्या एकूण आयुष्यात कणभरही स्थान दिले नाही. आपली कृती माणूसकीच्या निकषावर कायदेशीर व नैतिक ठरली पाहीजे अशी त्यांची स्वच्छ भूमिका होती. स्वाभविकच आपल्याकडील कर्जखते गोरगरीबांचे संसार मोडू शकतात या कल्पनेने त्यांचे मन बेचैन झाले. ही कर्जखते अंतः करणाला खुपू लागली एखादया अपवित्र कलंकाप्रमाणे आपल्या व्यक्तित्वाला चिकटून त्याला डागाळणारी ही कागदपत्रे हे त्यांच्या काळजात घुसणारे एक शल्य बनले. हे शल्य आपल्या हृदयातून उपटून फेकून दिले. पाहीजे असा त्यांनी निर्धार केलेला हाच त्यांचा भांबवनाथाच्या डोंगरावर झालेला साक्षात्कार होय. या साक्षात्काराची परिणीती म्हणून त्यांनी भांबनाथाच्या डोंगरावरून खाली उतरल्याबरोबर दुसरे काहीही करण्या अगोदर आपल्या वाटणीची कर्जखते इंद्रायणीत बुडविली स्वतःचे शुद्धीकरण केले आणि समाजव्यवस्थेचे शुद्धीकरण करण्याच्या दिशेने पाहिले पाऊल टाकले. जगाला काही उपदेश करण्यापूर्वी संतत्वाची कसोटी स्वतःच्या जीवनाला लावली.

ही कसोटी स्वतःला लावणे फार महत्वाचे आहे कारण समाजाचे हित साधू पाहणाऱ्या माणसावर काही जबाबदाऱ्या येतात कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात

समाजाचे नेतृत्व करू पाहणाऱ्या लोंकावर काही नैतिक बंधने येतात. आपल्या स्वतःच्या आचरणाने लोकांना धडा घालून देणे त्यांना वाट दाखविणे हे त्याचे कर्तव्य ठरते.

लेखकाने या उदाहरणाच्या स्पष्टीकरणाद्वारे तुकारांमांच्या सर्व जीवनाचे सार व त्यांच्या आयुष्यात घडलेले सत्य भावी पिंढयापुढे मांडून तुकारामांच्या जीवनातील अंधारातील भाग उजेडात आणला आहे. हा भाग अंधारात होता याचा अभ्यास केला असता असे दिसून येते की हया गोष्टी अंधारात ठेवल्यामुळे तुकारामांच्या मोठेपणाची बाजू झाकल्याने संत तुकारामांच्या संतत्वाची सोनेरी किनार पूर्णपणे झाकली जात होती. तुकारामांच्या मनाची विशालता पूर्णपणे झाकली जात होती.

कर्जखते बुडविण्याच्या तुकारामांच्या कृतीमागचा हा विवेक हे संतुलन नीट समजून घेणे लोकांना जमले नाही. त्यांनी कर्जखते बुडवली याचा अर्थ त्यांचे मन संसावरून उडाले असा अर्थ काहीनी लावला एकूण काय ते व्यवहार शून्य असल्यामुळे त्यांच्याकडे संसार करण्याची कुवत नव्हती असा अर्थ आणखी काहींनी लावला एकूण काय त्यांचे हे कृत्य संसारी माणसला साजेसे नाही याविषयी बहुतेकांची खात्री झाली सावकाराच्या मुलाने जबरदस्ती करावी शिवागिळ करून वसुली करावी दांडगाई करावी. हेच लोकांना सुसंगत वाटते कर्जखते बुंडविणारा सावकाराचा मुलगा त्यांना नेभळट बावळट दळभ्रद्री वाटला त्याने हे दुबळेपणातून केलेले नसून कांही मुल्याच्या प्रतिष्ठापनेसाठी केले आहे त्यांच्या संवर्धनासाठी केले आहे. हा बारकावा ते धान्यात घेवू शकले नाहीत. याचा परीणाम म्हणून पुढे त्यांची व्यवहारशुन्यता दाखवणाऱ्या असंख्य दंतकथा रचल्या गेल्या आणि त्यांच्या खऱ्या खुऱ्या प्रतिमेचा विध्वंस झाला.

**वेदांच्या अर्थाची उपेक्षा**

वेदांची निर्मिती झाली तेव्हा लिपीचा शोध लागलेला नव्हता त्यामुळे वेदांचे

रक्षण करण्यासाठी पिढयानपिढया जसेच्या तसे जपले जावेत म्हणून वैदिकांनी पाठांतराद्वारे वेद टिकवून धरले परंतु काळयाच्या ओघात त्यांनी आपले सगळे लक्ष पांठातरावरच केंद्रीत केले ते अर्थाची उपेक्षा करून केवळ घोकंपट्टी करू लागले. शब्दालाच गैरवाजवी महत्व आले. वेद प्रमाणात शब्द प्रमाण अशी संज्ञाच प्राप्त झाली. वेदांनी काय सांगितले याचा गंधही नसलेले लोक केवळ घोकंपट्टी करून स्वतःला वैदिक पंडीत विद्वान ज्ञानी आत्मज्ञानी वैगेरे मानू लागले पोकळ शब्द ज्ञानाच्या जोरावर स्वतःला पंडित समजणारे हे लोक आपल्या पोकळ विद्वतेची घमेड बाळगू लागले आणि इतरांना हिणवू लागले.

आपल्या अवती भवती चाललेला हा प्रकार म्हणजे खऱ्या ज्ञानाची विटंबना आहे हे तुकारामांनी ओळखले. नुसते पांठातर कसे निरर्थक आहे हास्यास्पद आहे हे त्यांनी अनेक अभंगातून दाखवून दिले अर्थात अर्थाला जसे महत्व असते तसेच शब्दांनाही महत्व असते आणि हे शब्दांचे महत्व स्वतः तुकाराम जाणत होतेच अर्थाची पूर्ण उपेक्षा करून शब्दांच्या घोकंपट्टीकडे वळू नये एवढेच त्यांचे म्हणणे होते जोपर्यंत अंतकरण शुध्द नाही तोपर्यंत भाराभार केलेली पाठांतर व्यर्थ आहे.

शब्दज्ञानी मनुष्य आपण ज्ञानी असल्याचा आव आणतो पण त्यामुळे तो समाजात हास्यास्पद होतो हे तुकाराम दोन अभंगात सांगतात.

1. वांझ स्त्री पोटावर चिरगुटे बांधते
2. कागदावर साखर हा शब्द लिहून तो चाटला. .

वांझ स्त्री पोटावर चिरगुटे बांधते

शब्दज्ञानी मनुष्य आपण ज्ञानी असल्याचा आव आणत असतो हे तुकारामांनी दोन अभंगात अगदी नाटयमय पद्धतीने दाखवून दिले आहे त्यापैकी एका अभंगाचा आशय असा.

एका वांझ स्त्रीने पोटावर चिरगुटे बांधून पोट वाढवले आणि आपण, गरोदर आसल्याचा बोभटा लोकांमध्ये केला.

डोळाहे लागण्याचा खोटा प्रकारही केला. प्रत्यक्षात तिच्या स्तनात दूध नव्हते,

की पोटात पोर नव्हते अखेरीस वांझपण हेच तिचे वास्तव होते. पण तिने लोकांमध्ये स्वतःची फजिती मात्र करून घेतली.... वांझ स्त्रीचेच उदाहरण घेवून ते दुसऱ्या एका अभंगात म्हणतात एका वांझ स्त्रीने पोटावर चिरगुटे बांधून गरोदरपणाचे लक्षण दाखविले त्याच पद्धतीने शब्दज्ञानी लोक आपले ज्ञानपोटासाठी विकून चावटपणा करतात शब्दाचीच कढी आणि शब्दाचाच भाग असे अन्न जेवून कोण बरे तृप्त झाला?

कागदावर साखर असा शब्द लिहून चाटला असता तो शब्द काही मधूर चव देत नाही. या शब्दांनी माणसाची महंती जळो या मुर्दाडाच्या मनात लाजलज्जा नाही. वांझेने केवळ गरोदर असल्याने नव्हे तर बाळंत झाल्याचेही सोंग करावे तशी स्थिती अनुभव नसलेल्या शब्दज्ञान्याची असते हे एका अभंगात त्यांनी प्रभावी रीतीने मांडले आहे. ती गधडी बाळंत न होताच बारसे वैगरे मंगल विधीचे चाळे करीत आहे. इतर बाळंतिणी करतात ते पाहुन तिने कशाला बरे हे विधी करावेत? साखरेची गोडी नुसती सांगून तिचा अनुभव घेता येतो काय ? जेवण न करता उगाचच कुंथून ढेकर दिल्यामुळे शरीराचे पोषण होत नाही. उलट शरीराच्या कष्टी व मलिन रूपाने प्रदर्शन घडते. हे वाचाळांनो ऐका अनुभव न घेता उगाचच बडबडू नका. अर्थ न जाणांता नुसते पाठांतर करणाऱ्या आणि अनुभव न घेता शब्दांची पोकळ बडबड करणाऱ्या तथाकथित पंडितावर तुकारामांनी ओढलेले हे कोरडे त्यांच्या मर्मावर जबरदस्त आघात करणारे आहे. यात शंका नाही तुकारामांने या अर्थाचे अभंग, भजन, किर्तन इ. माध्यमातून लोकांपर्यंत पोहचू लागले असतील तेव्हा वैदिकांच्या गोटात एक खळबळ माजली असेल हाहाःकार उडाला असेल, एखादे वादळ घोंगावत आल्यासारखे झाले असेल यात शंका नाही. आजपर्यंत लोकांच्या दृष्टीपुढे असलेली वैदिक पंडितांची प्रतिमा अगदी वेगळी होती. जगातील सर्व ज्ञान त्यांच्याकडेच आहे. सृष्टीची सर्व रहस्ये त्यांनाच कळतात त्यांच्या मधस्थीमुळेच देवांची आपल्यावर कृपा होवू शकते किंबहुना ते पृथ्वीवरचे मूर्तीमंत देवच आहेत. इत्यादी प्रकारच्या त्यांच्या

विषयीच्या धारणा लोंकाच्या मनात होत्या स्वाभविकच समाजामध्ये त्यांची मोठी प्रतिष्ठा होती ते केवळ आदराचा नव्हे तर पूजेचा विषय होते. त्यांचा शब्द पवित्र मानला जात होता त्यांचा आदेश शिरसावंद्य ठरत होता.

थोडक्यात म्हणजे वैदिक पंडित समजात सन्मानाच्या व प्रतिष्ठेच्या सर्वोच्य शिखरावर विराजमान झालेले होते. अशा स्थितीत कोणी एक मनुष्य उभा राहतो आणि या पंडीताकडे मुळी खरेखुरे ज्ञानच नाही अशी घोषणा पुन्हा पुन्हा करू लागतो तेव्हा देहूची सामाजिक भूमी भूकंप झाल्यासारखी थरारली असेल यात शंका नाही विशेषतः ज्याला मूळी वेदाचे एक अक्षर उच्चरण्याचाही अधिकार नाही अशा शुद्राने आपल्या ज्ञानविषयी शंका घेतल्याचे पाहून त्यांच्या मेंदूला झिणझिण्याही आल्या असतील आणि त्यांचे विषारी दात सळसळेलेही असतील हे उघड आहे.

नुसत्या घोकंपट्टीला अर्थ नाही खरे महत्व अर्थ ज्ञानाला आहे ही तुकारामांची भूमिका अगदी निर्दोष असल्यामुळे वैदिक पंडित उघडपणे तिला आव्हान देवू शकत नव्हते, ते खोडून काढू शकत नव्हते, दुसरी गोष्ट म्हणजे तुकारामांच्या आचरणामुळे त्यांच्या शंब्दांला मोठे वजन प्राप्त झाले होते कर्जखते बुडवणे आणि दुष्काळात गरीबांना मदत करणे यामुळे ते निस्वार्थी असल्याची लोंकाची खात्री झाली होती. ते जे काही बोलतात त्यामागे काही खोटेपणा असणारा नाही अशी लोकांची धारणा होवू लागली होती या सर्व प्रकारामुळे वैदिक पंडित बैचेन झाले असणार हे स्पष्ट आहे. तुकारामामुळे आपल्या प्रतिष्ठेवर सुखोपभोगावर घाला येत आहे हे ओळखून त्यांचा जळफळाट सुरू झाला असणारा हेही स्पष्ट आहे.

वैदिक पंडिताना तुकारांमाच्या अभंगाचे चटके आधिकच दाहक वाटण्याचे आणखी एक कारण होते. तुकाराम महाकवी होते शब्दप्रभू होते. ते शब्दांची निवड अत्यंत चोखंदळपणे करीत त्यामुळे त्यांचे विचार लोकांच्या अंतकरणाला भिडत ते विचार त्यांची मने जिकून घेत. त्यांच्या मनात प्रतिसादाची आंदोलने उठवू शकत

त्यांच्या भावनांना; विचारांना वळण लावू शकत. स्वाभाविकच वैदिक पंडीताविषयी त्यांच्या मनात जो अदरभाव होता त्याला तडे जावू लागले पंडितांच्या सिंहासनाला हादरे बसू लागले.

तुकारामांचा एक एक अभंग कसा जिव्हारी लागला असेल ते पाहण्यासारखे आहे. घोकंपट्टी करून शब्दांचे ओझे वाहिल्याबद्दल या पंडितांना ज्ञानी म्हणायचे असेल तर घोडयांनाही ज्ञानी म्हणावे लागेल कारण ते पंडितापेक्षा कमी ओझे वाहत नाहीत हा तुकारामंचा युक्तिवाद पंडीतांना जहरी डंखासारखा वाटला असणार. साखरेची चव न चाखता नुसत्या गोण्या वाहणाऱ्या बैलाबरोबर ओझी वाहूनही काटे खाणाऱ्या उंटाबरोबर केलेली तुलना मनाला झोंबली असणार अशा पंडीतांना मेल्याहून मेले वाटले असणार. वैदिक पंडितांनी आजवर लोकांना नुसत्या शब्दांची कढी पाजली आणि नुसत्या शब्दांचाच भात जेवू घातला पण हे जेवण करून कोणीही तृप्त झाला नाही हा तुकारामांनी काढलेला निष्कर्ष जितका दाहक तितकाच सत्य आहे.

वैदिक परंपरेने आजवर समाजाला नुसते पोकळ शब्द दिले खराखुरा अन्नरस दिला नाही त्यामुळे कित्येक पिढया, कित्येक युगे समाजाची उपासमार झाली तहानमार झाली हे ऐतिहासिक सत्य त्यांनी लोकांच्या नजरेला आणून दिले या प्रकारचे विचार मांडणारा तुकारामांचा एक एक अभंग हा वैदिक पंडितांना चाबकाच्या एकेका फटकऱ्यासारखा वाटला असणार आणि प्रत्येक फटकाऱ्याबरोबर त्यांच्या मनात तुकारामांच्या विषयी शत्रुत्वाची, वैराची, सूडाची एकेक ज्वाला भडकली असणार यात शंका नाही अर्थात तुकारामांनी हे वैर स्वतःवर ओढवून घेतले होते आणि ते काही वैयक्तिक कारणाने ओढवून घेतले नव्हते तर समाजव्यवस्थेच्या शुध्दीकरणासाठी ओढवून घेतले होते.

तुकारामांच्या दृष्टीने अस्सल अनुभवाला खरे महत्व होते पुष्कळ गोष्टी व्यर्थ होत्या. अनुभवांचे महत्व सांगणारे त्यांचे काही विचार असे आहेत. ज्यांना अनुभव नाही त्यांनी लोकांचे मनोरंजन करण्यासाठी नुसती पोकळ कहाणी

सांगावी या पोकळ कहाणीचा काय उपयोग ?

शब्दांना येणारा पोकळपणा अर्थज्ञानाच्या, अनुभवाच्या अभावीच येतो असे नाही. शब्दांद्वारे केलेल्या उपदेशाला अनुसरून आचरण केले नाही तरी शब्दांना पोकळपणा येतो. तुकारामांचे व्यक्तित्व आचरणाला फार महत्व देणारे होते. आचरणाची कसोटी ते अगोदर स्वतःच्या व्यक्तित्वाला लावत असत. मगच इतरांचे मुल्यमापन करीत असत.

वेदांची आज्ञा जशीच्या तशी पाळली पाहिजे. हा नियम वैदीक पंडीत काही वेळाअगदी कठोरपणे अमलात आणत असत याचा कडवट अनुभव स्वतः तुकारामांनीच घेतला होता. विशिष्ठ नियमांच्या आधारे त्यांना शुद्र ठरवण्यात आले होते आणि त्यांना वेदाचा अधिकार नाकारण्यात आला होता. शुद्रांना वेदाचा अधिकार नसतो या नियमाचे त्यांच्या बाबतीत अत्यंत निदर्यपणे पालन करण्यात आले. पण या सर्व प्रकारत वैदिक पंडितांचा दुटप्पीपणा करतात. असे तुकारामांच्या ध्यानात आले. नियम आपल्याला सोयिस्कर असला तर त्याचे पालन करायचे पण तसा नसला तर मात्र तो नियम पडीक ठेवायचा असे या पंडितांचे धोरण होते वैदिक पंडित अत्यंत महत्वाच्या नियमांचे पालन करत नाही दृ हे त्यांनी सगळयांच्या निर्दशनास आणून दिले. उदा वैदिक पंडित वंदांनी सांगितलेले ब्राम्हाचे समत्व आणि देहाची अनासक्ती यांचे पालन करीत नाहीत या अर्थाचे तुकारामांचे अभंग महत्वंपूर्ण आहेत त्यांचा आशय असा स्वतःला पंडित म्हणूवून घेताना त्याला मोठे सुखी वाटते पण खरे पाहीले तर तो इथूननिधून मुर्ख म्हटला पाहीजे त्याने केलेल्या धोकपट्टीचा काय उपयोग? त्याचे वेदपठंतर वाया गेले असे म्हटले पाहीजे कारण तो वेदाला सांगितलेले करत नाही हा दुराचारी मनुष्य समब्रम्ह म्हणजे काय ते जाणत नाही. तुकाराम मात्र प्रत्येक जीवनशिव पाहाते आणि हाच वेदामधील अनुभव आहे.

अर्थ न जाणता केलेले वेंदपठण वाया जाते तसेच आचारणाशी न जोडलेले वेदपाठण ही वाया जातो हे तुकारामांनी निक्षुन सांगितले आहे.

उपनिषदांनी म्हणजे वेदांनी सर्वाचा आत्मा एकच आहे. हा आत्मा म्हणजे ब्रम्ह होय सर्वाच्या अंर्तयामी ब्रम्ह आहे. समत्व हे ब्रम्हाचे स्वरूप आहे इ. प्रकारचे समतेचे तत्वाज्ञान पुनःपुन्हा मांडले आहे. प्रत्यक्षा व्यवहारात मात्र वैदिक परंपरेने पावलोपावली विषमता केली आहे समता कधीच आणली नाही.

तोंडाने ब्रम्हज्ञानाच्या गप्पा मारणाऱ्या लोकांवर तुकारामाचा आणखी एक आक्षेप होता हे लोक प्रवचन, धर्माचा उपदेश इ. गोष्टी पैशासाठी उदरनिर्वाहासाठी करतात हा त्यांचा आक्षेप होय. धर्माचा उपदेश करण्याचे वर्तन निस्पृह असले पाहीजे.

आपण वेद जाणतो अशा जाणिवेतून निर्माण झालेला गर्व वा घमेंड याचा तुकारामांनी तिरस्कार केला आहे. ते म्हणतात माणसाला त्याची शुद्ध भावना तारते अहंकारामुळे मात्र तो नाश पावतो अहंकारी लोकांचा तुकाराम धिक्कार करतात.

जो शिष्याची सेवा घेत नाही. आणि आपल्या देहभावाबद्‌दल उदासीन अनासक्त असतो त्याचे ज्ञान हे खरे ब्रम्हज्ञान होय आसक्ती धरू नये निश्चल रहावे आणि ममतेचा मळ लागू देऊ नये याचे नाव अद्वैत आणि हेच खरे ब्रम्हज्ञान होय. या अनुभवावाचून बाकीची केवळ बडबड बरे. इंद्रियांचा जय, वासनेचा क्षय, मन संकल्पावर येऊ न देणे ,अंतकरणात अहंकार येऊ न देणे आणि मनात आनंद भरून टाकणे हे खरे ब्रम्हज्ञान होय.

इतके सांगून लेखक म्हणतात. तुकारांमानी ब्रम्हज्ञानाच्या संदर्भात मांडलेले हे विचार इतके स्वयंस्पष्ट आहेत की त्यावर अधिक विवेचन करणाची आवश्यकता नाही. तुकारामांची विठ्ठल भाक्ती म्हणजे वैदिकांचे संकुचित ज्ञानकांड आणि किचकट कर्मकांड यांना त्यांनी दिलेला प्राजंल पर्याय आहे.

शुद्रांना वेदांचा अधिकार नाकारणारी व्यवस्था तुकारामांनी निमुटपणे स्वीकारली नव्हती तिच्या विरूद्ध त्यांनी विद्रोह केला होता.

वेदातीलच नव्हे तर वेदांच्या पलीकडे असलेला आशय तुकारामांनी

मांडत हे खरेच आहे. वेदांच्या संकुचित पारिघात न मावणारी माणुसकीची उदात्त मुल्य प्रसंगी वेदांच्या विरोधात ही जाऊनही मांडली हे विचार आपल्या तोंडून इश्वांराने बोलविले असे तुकाराम म्हणतात याचा अर्थ तुकारामासाठी वेदांचा मार्ग बंद असूनही जीवनविषयक मुल्ये मिळण्याचे इतर मार्ग त्यानां उपलब्ध होते नामदेव ज्ञानेश्वर कबीर एकनाथ या सारखे संताचे विचार आत्मसात केल्यामुळे आणि समाजाचे निरीक्षण सखोल चिंतन यांचे फळ म्हणून तुकारामांना जो विवेक प्राप्त झाला तो विवेकच खरे तर त्यांच्या तोडून बोलत होता असे लेखक आ. ह. साळुंखे मांडतात.

ज्याने मान खाली घालून निमुटपणे आज्ञा पाळली पाहीजे अशा एका शुद्राने केलेल्या या विद्रोहामुळे टीकेच्या भडिमारामुळे वैदिक पंडिताच्या तळपायाची आग मस्तकाला गेली असेल हे सांगण्याची आवश्यकता नाही. ज्यांनी किमान अडीच तीन हजार वर्ष सर्वकंष सत्ता भोगली होती. त्यांना ही भाषा पचवणे फार जड गेले असणार ज्यांच्या नैतिकतेच्या जाणिवा स्वतःला पृथ्वीवरचे देव मानण्याइतक्या आणि स्वतःचा शब्दहेच अंतिम सत्य असल्याचे मानण्या इतक्या ऱ्हास पावल्या होत्या. त्यांच्या दृष्टीने हे सगळे सहनशक्तीच्या पलीकडचे असणार तुकारामांच्या विषयीच्या त्यांच्या मनात द्वेषाच्या तिरस्काराच्या विषयीच्या त्यांच्या मनात ज्वाला उफाळून आल्या असणार खरे तर तुकारामांचे वर्तन बहुजन समाजाला जागृत करेल विचारी बनवेल आणि त्यामुळे आपले हितसंबंध सुखोउपभोग प्रतिष्ठा यांच्यावर गडांतर येईल या भावनेने त्यांच्या मनात संताप आला होता परंतु तसे दाखवणे हे व्यावहारीक दृष्टया सोयीचे नसल्यामुळे त्याला धार्मिक कारणाचे आवरण घालण्यात आले. तुकाराम धर्म बुडवत आहेत. धर्मद्रोह करीत आहेत पाखंड माजवत आहेत अशी त्यांच्या विरोधात हाकाटी सुरू करण्यात आली. धर्माचे रक्षण करण्यासाठी तुकारामांचे हे पाखंड मोडून काढले पाहीजे, आणि त्यांचे भजन किर्तन थांबवले पाहीजे अभंग लेखन बंद पाडले पाहीजे आणि हे सगळे वेदांच्या व धर्माच्या रक्षनासाठी, वैदिक मार्गाच्या रक्षणासाठी केले पाहीजे असा निर्णय वैदिक पंडीतानी घेतला या

निर्णयानंतर तुकारामांचे तोंड बंद करण्यासाठी त्यांनी अनेक गोष्टी केल्या त्यापैकी एक महत्वाची गोष्ट म्हणजे तुकारामांवर भरण्यात आलेला खटला वैदिक पंडितानी तुकारामावर भरलेला हा खटला म्हणजे तुकारामबरोबर चालेल्या युद्धात त्यांनी मारलेली जोरदार मूसंडी होती आक्रमक चढाई होती.

बहुजन समाजाच्या प्रगतीची लक्षणे ओळखून वैदिकपंडितानी प्रगती दाखविलेल्या केलेल्या प्रयन्तातील हा एक मोठा भाग होय अशा प्रकारे उच्चवर्णीय समाज हा आपला उच्चपणा आबाधित राखण्यासाठी खऱ्याचे खोटे करायला मागे पहात नव्हता वाटेल ते करण्याची उच्चवर्णियांची तयारी यातून दिसून येते. परंतु उच्चवर्णियांची नीच वृत्ती यातून दिसून येते. असे मला वाटते.

यतिमुळे येथे असे अप्रमाण

तुकारामांचे वेगळेपण असे की त्यांनी आपल्या अभंगातून भेदभाव करण्याचा विघातक प्रवृत्तीवर जोरदार हल्ले केले आपल्या समाजावस्थेतील घृणास्पद प्रदुषणाची हकालपट्टी करण्याचा आग्रह धरला भेद करण्याची भावनाही अनैतिकता असून समतेचा आचार विचार हीच खरी नीती व धर्म आहे अशी त्यांची भूमिका आहे. हा श्रेष्ठ आहे आणि हा कनिष्ठ आहे. हा वेदांदीचा अधिकारी आहे आणि हा अनाधिकारी आहे हा स्पृथ्य आहे आणि हा अस्पृश्य आहे इ. प्रकारच्या वर्ण जातीच्या आधारे केला जाणारा भेदभाव हा आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक बनत होता. ऋग्वेदातील पुरूष सुक्तापासूनइतर असंख्य पुराण कथा, व्रतवैकल्ये, कर्मकांडे इ. पर्यत. परमेश्वराला सर्व माणसांचा पिता म्हटले जाते तसेच तो सर्वत्र असतो असेही मानले जाते. अशा स्थितीत माणसामासांमध्ये भेद करण्यास वाव कुठे उरतो असा तुकारांमाचा प्रश्न आहे. ईश्वराला सर्वाचा सर्वव्यापी पिता आणि सर्व माणसांना त्याची संताने मानायचे यामध्ये आढळणाऱ्या विसंगतीवर तुकारामांनी अचूक बोट ठेवले आहे. खरे तर या संदर्भात स्वतः परमेश्वरालाही हडसून खडसून जाब विचाला आहे तू जर सर्वांच्या अतर्यामी आहेस तर मग जगामध्ये तूहा भेद का दाखवत आहेस. असे त्यांनी त्याला ठणकावून विचारले आहे. याचा अर्थ माणसांनी काय पण देवाने

जरी विषमता निर्माण केली तर ती ठोकरली पाहीजे असा त्यांचा विश्वास आहे. कोणाचाही मत्सर न करणे सर्वांना समान मानने हाच खरा धर्म आहे असे ते मानत होते. मला सर्व लोक समान आहेत असे म्हणण्याइतकी समवृत्ति त्यांना प्राप्त झाली होती भेदभावांनी अत्यंत कलुषित झालेल्या आपल्या समाजाच्या दृष्टीने तुकारांमाचा समतेचा हा आग्रह म्हणजे एकानिर्मळ निर्झराचा उद्‌गम म्हणताला हवा असे लेखक म्हणतात. हया निर्झरत्याचे रूपातंर पुढे नदीत, नदीचे सागरात व्हायला हवे, परंतु तसे झाले नाही याची खंत मला वाटते लोक निर्झर हा फक्त निर्झरच पाहत राहीले आहेत तुकारामाच्या विचारांचा हा निर्झर लोकांनी काचेच्या पेटीत ठेवला आहे व तो किती सुंदर आहे त्याची भव्यता दिव्यता गात आहे ही खंत आहे.

तुकारामाच्या विचारांचे वारसदार निर्माण होणे इथे गरजेचे आहे.

**काय बा करिशी सोवळे ओवळे**

सोवळया ओवळयाची संकत्कना हा एकेकाळी आपल्या सांस्कृतिक जीवनात अगदी झपाडुन टाकणारा असा महत्वाचा घटक होता. विशेष ब्राम्हणांनी समाजावरील आपले वर्चस्व टिकविण्यासाठी या संकल्पेनेचा खुबीने उपयोग केला होता.

सोवळया ओवळयाची कल्पना इतरांना तुच्छ लेखण्यासाठी वापरली भारतातील पुरोहीतानी व विशेषतः ब्राम्हणांनी स्वतःला प्रविण मानून सोवळे पणाच्या एका कोशात कोंडून ठेवले हे सोवळे आहे हे ओवळे आहे अशा प्रकारेचे वगीकरण त्यांच्या ड़ोक्यात असे आम्हाला तुमचा विटाळ होईल आम्हाला शिवू नका आमच्या अंगावर तुमची सावंली पडू देऊ नका येथे तुम्ही बसलात वा जेवलात म्हणून ती जागा शेनान सारवून शुद्ध करा ती गोमुत्राने शुद्ध करा इत्यादी उद्‌गाराने ते इतराना दूर लोटत असत आपल्या पासून अंतरावर ठेवत असत आणि स्वतःच श्रेष्ठत्व इतर सर्वाच्या मनावर ठसवत असत लौकिक अवस्थेतून सोवल्या अवस्थेत जाण्यासाठी किंवा सोवळेपणा टिकविण्यासाठी ते विशिष्ठ मंत्राचा उच्चार, सोवळे म्हटल्या जाणाऱ्या वस्त्राचे परीधान दिक्षा ग्रहण यासारख्या अनेक गोष्टींचा वापर करीत असत.

ब्राम्हणांना स्वतःच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने सोवळया ओवळयाची संकल्पना फार महत्वाची वाटत होती तर दुसरीकडे तुकारामांनी या संकल्पनेवर अनेक बाजूनी प्रहार केले.

सर्व प्रकारच्या सोवळया ओवळयापासून निराळा आहे या शब्दात त्यांनी या बाबतीत आपला निर्धार व्यक्त केला आहे. भावना आणि आचरण शुध्द नसेल तर सोवळे ओवळे काय करीत बसला आहेत. जोपर्यंत मन निर्मळ नाही तोपर्यंत हे सर्व व्यर्थ आहे.

तुकारामांनी अशा रितीने सोवळया ओवळयाची भेदभावाची संकल्पना उधळून लावली तथापी ती मानायची झाली तर कशी मानता येईल याविषयी त्यांनी एक विधायक भूमिका मांडली आहे.

परद्रव्य आणि परनारी यांच्याशी संपर्क करणे हाच खरा विटाळ असून जो त्यांच्यापासून दूर राहतो तोच खरा सोवळा ज्यांच्या मनात इश्वराविषयी अखंडित प्रेमभाव असतो तेच लोक या भूमंडळावर पवित्र व सोवळे असतात. जेथे देवाविषयी तळमळ आहेत तेथे कशाचा विटाळ ? सोवळया ओवळयाविषयी आपली भूमिका स्पष्ट करणारे तुकारामाचे दोन अभंग त्यांचे तात्पर्य लेखक सांगतात.

बाहेरून शरीर धुवून काय उपयोग ? मन तर अजून मळलेले आहे. जन्मभर अधि असत्याने व्यापले आहे. तू दांभिक व्यवहार सोडून दे मन आणि वाचा यांना शुध्द कर. आपल्या चित्ताच्या शुध्दनिशुध्दतेला तू स्वतःच ग्वाही दयायची आहे. पापपुण्याच्या विटाळाच्या विचाराने तू स्वतःला भरून टाकत आहेत. काही विचार करत नाही. अवघी पृथ्वी सोवळी आहे तिचा काही भाग शुध्द आणि अशुध्द म्हणून कशाला चाचपत आहेस ? तू कामक्रोधापासून वेगळा हो या अर्थाने सोवळा हो. सोवळया ओवळयाविषयीची नुसती बाहय कलाकुसर गुंडाळून ठेव.

तुकारामांनी ज्याप्रमाणे सोवळया ओवळया औपचारिकतेपासून अलिप्त केले होते त्याप्रमाणे इश्वर देखील त्या औपचारिकेपासून अलिप्त आहे अशीच त्यांची धारणा होती.

सोवळ्या ओवळयाची चाकोरी जपण्यावरच त्यांची प्रतिष्ठा अवलंबून असते, ते लोक मात्र इश्वरालाच सोवळेपणाच्या कचाटयात अडकवून टाकतात. सर्वसामान्य माणसे त्यांच्यापर्यंत सहजपणे पोचणार नाहीत अशा रितीने त्याला आपल्या कैदेत जखडून टाकतात.

ब्राम्हणाकडे असलेला ब्राम्हण्याचा अभिमान त्याच्या आधारे त्यांनी पोसलेले आपले वेगळेपण या गोष्टी निकोप समाजरचनेच्या आड येतात हे तुकारामांनी ओळखले होते म्हणूनच ब्राम्हणांना त्यांनी आपल्या ब्राम्हणाचे विसर्जीत करण्याचे अवाहन दिले होते. शेंडी व जानवे ही ब्राम्हणाची आहेरून ओळखता येणारी स्पष्ट चिन्हे आहेत. त्यामुळे तुकारामांनी ब्राम्हणांना शेंडी व जानवे यांच्या बरोबरचा संबंध तोडून टाका असे सुचवले आहे. ही चिन्हे ब्राम्हणांना आपल्या श्रेष्ठत्वाची प्रतिके वाटत असली तरी ती प्रत्यक्षात त्यांच्या गुलामगिरीची लक्षणे आहेत हे त्यांनी दाखवून दिले त्यांचे हे मत पूर्णपणे योग्यही आहे. गुलामांना स्वत:ची मते नसतात तो स्वतंत्रपणे निर्णय घेवू शकत नाही त्यांची प्रतिभा कुलिन होते शिखासुत्र धारण करणारे ब्राम्हणही वेदाचे गुलाम आहेत ते वेदांना बाजुला ठेवून सारून स्वतंत्रपणे काहीही करू शकत नाहीत हे सगळयांना ठाउक आहे.

परंपरागत कर्मकांडे करताना देशकाळांची शुभाशुभता पाहिली जाते. शुभमुहूर्त शोधण्यासाठी आटापिटा केला जातो. सर्वसामान्य माणसांच्या दृष्टीने हे अत्यंत जाचक असते. इश्वराच्या भक्तीसाठी मात्र देशकाळ पहावे लागत नाही हे तुकाराम आवर्जून सांगतात सव्यापासव्याचा वा डाव्याउजव्याचा विचार करून शुध्दी वा अशुध्दी ठरवण्यापेक्षा कर्मे इश्वरालार अर्पण करण्याच्या बुध्दीने करावी असे त्यांनी म्हटले आहे तुकारामांनी सर्वसामान्य लोकांना शुभा अशुभाच्या कचाटयातून सोडवले असाच याचा अर्थ होतो.

विधिनिषेधाच्या डोहात बुडू नका विधी आणि निषेध हा वैदिक धर्माचा गाभा आहे असे म्हणता येईल अमूक कर्म करा अशी वेदांनी व इतर धर्मशास्त्रांनी दिलेली आज्ञा म्हणजे विधी होय. याउलट अमुक कर्म करू नका अशी त्यांनी दिलेली आज्ञा

म्हणजे विधी निषेद होय. उदा. विशिष्ठ फळ मिळविण्यासाठी अमुक यज्ञ करावा त्या यज्ञात अमुक वस्तुची आहुती द्यावी पितरांसाठी श्राध्द करावे इ. प्रकारचे नियम विधी आहेत. शुद्राने वेदांच्या मंत्राचा उच्चार करू नये वा ऐकू नये. अस्पृश्य मानल्या गेलेल्या व्यक्तिने इतरांना स्पर्श करू नये इ. प्रकारचे नियम निशेध होत या विधिनिषेधाच्या डोहात बुडू नका.

कोणी गुरू नाही, कोणी शिष्य नाही खरे पाहता तुकारामांच्या गुरूशिष्यावर विश्वास नाही. त्याच्या मते एका माणसाने गुरू बनायचे व दुस--याने शिष्य बनायचे अशा प्रकारचे वर्तन हे अधम लक्षण आहे. सर्व प्राणिमात्रांमध्ये नारायण असतो त्यामुळे जसे आपण तसाच दुसरा मनुष्य होय. अशा स्थितीत दुस--या माणासाला गुरू अथवा शिष्य मानने योग्य नव्हे. संसारी लोकांच्या दृष्टीने गुरूचे दास्य हे काही इश्वर प्राप्तीचे साधन होवू शकत नाही. मानवी गुरूची आवरकाता नाही असे तुकारामांनी सांगितले याच तत्वाची दुसरी बाजू स्वाभाविकपणे आपल्यापुढे येते. गुरू नको असे म्हणणे याचा अर्थ शिष्य नको असाही आपोआप मिळतो.

दक्षिणेवर नजर ठेवणारा रिकाम्या मापासारखा दगडाच्या नावे सारखा आणि स्वतःला पोहायला येत नसताना इतरांना पोहायला शिकवू पाहणा--या मुर्खासारखा गुरू असू नये हे तुकारामांनी पुन्हा पुन्हा सांगितले आता गुरू करायचा तर तो कसा असावा याविषयीचे त्यांचे मत पाहू या शिष्याची सेवा न घेता त्याला देवाप्रमाणे मानणारा गुरू हाच खरा गुरू असे त्यांना वाटते. शिष्य हा आपला गुलाम नसून तो देवासारखा आहे आपल्या ज्ञानाच्या प्रकाशात अधिक भर घालून तो पुढच्या पिढयांकडे नेणारा दुवा आहे त्याला हिणवता कामा नये त्याच्र्याकडून सेवा घेता कामा नये त्याचा आदर केला पाहिजे त्याच्या व्यक्तित्वामधील माणूस पण खुजे होता कामा नये. गुरू शिष्य संबंधाला तुकारामांनी दिलेले हे परीणाम अत्यंत देखणे लोभसवाणे आहेच पण गुरू श्रेष्ठ आणि शिष्य कनिष्ठ अशा प्रकारची या संबंधातील उच्चनीचता दूर करू. दोघांना माणूस या नात्याने एका समान पातळीवर आणणारे आहे.

तुकारामांनी पांडुरंगाला गुरू मानले असले तरी कोणाही मानवला गुरु मानलेले नव्हते हे लेखकाने स्पष्ट केले आहे. तुकारामांना न्यायालयात खेचले वैदिक पंडीताचे वर्चस्व असलेली जीवनपध्दती व धार्मिक व्यवस्था यांना जोरदार हादरे बसतील अशा आचार विचारांचा पुरस्कार तुकाराम करीत होते आणि त्यांच्या उपदेशाचा लोकांच्या मनावर प्रभावही पडत होता. तुकारामांच्या या हल्यामुळे त्या पंडितांची सामाजिक प्रतिष्ठा समाजावरील नियंत्रण आर्थिक उत्पन्न आणि त्यांचे एकूणच हितसंबंध यांना तडे जाण्याची शक्यता निर्माण झाली. त्यांमुळे त्यांच्या तळपायाची आग मस्ताकाला गेली यात संखा नाही. पिढया न पिढया पुष्ट होत असलेलसत्यांचा अहंकार दुखावला गेला. आपल्या हितसंबंधाच्या रक्षवासाठी तुकारामांचे तोंड बंद करने आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना न्यायालयीन खचवे हामहत्वाच्या भाग होता.

तुकारामांनी कर्जखते बूडवल्याची घटना जशी महाराष्ट्राला अपरीचित राहीली आहे तशीच त्यांच्यावर भरण्यात आलेल्या खटल्याची घटनाही लोकांच्या मनावर बिबेल ठसेल अशा प्रभावीरीतीने फारशी मांडण्यात आलेली नाही. त्यांची गाथा बुडवीण्यात आली त्यांचा छळ झाला इ. गोष्टी लोकांना स्पष्टपणे माहीत असतात पण खटल्याची चर्चा मात्र फारशी चर्चा होत नाही प्रत्यक्षात त्यांच्यावर खटला भरण्यात आला होता ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे आ. ह. साळुंखे यांनी तुकारामांच्या खटल्यांच्या संदर्भात आपले विचार मांडताना म्हणतात धर्मशास्त्रांच्या नियमाप्रमाणे जायचे तर या संदर्भात तुकारामावर ठेवण्यात आलेले आरोप निर्विवादपणे सिद्ध होत होता. एक तरवेदांचा तो अर्थ आम्हीसही ठावा, घरी वेदाना वाहे पाणी इत्यादी उद्‌गारातून स्वतः व्यासंग असल्यामुळे त्यांना वेदांची अनेक वचने कोणत्या ना कोणत्या प्रकारे ज्ञात झाली होती. आणि होत होते पण सर्वात महत्वाची गोष्टम्हणजे त्यांचे अनेक अभंग आशयाच्या आणि आर्थिव्यक्तिच्या दृष्टीने उपनिषदांच्या महावाक्यानाही लाजवतील. इतके प्रभावी होते वैदिक पंडित ज्याला वेद ऐकण्याचा वाउच्चारण्याचा अधिकार दयायला तयार नव्हते तो माणूस येथे वेदांच्या तोडीचे नव्हे तर त्यांच्यापेक्षा शतपटीने श्रेष्ठ वाङ्‌मय रूस्वतः निर्माणच करू

लागला. होतो. ऐकणे वा उच्चारने हा गुन्हा कानातोंडात उकलते शिसे ओसव्या इतका गंभीर असेल तर निर्मिती करणे हा गुन्हा वैदिक पंडितांच्या दृष्टीने किती आक्षेपार्ह आणि किती बेकायदेशीर असेल याचा तर्क आपण सहज करू शकतो.

स्वाभाविक वैदिक पंडितानी तुकारामाना या आरोपखाली न्यायालयाचे खेळले हे त्यांच्या धर्मयशास्त्राशी सुसंगत होते ती धर्मशास्त्रे न्यायाशी नितिशी आणि माणुसकीशी सुसंगति नव्हते ही वेगळी गोष्ट आहे. तुकारामांच्यावर वेदांच्या आधारे ठेवलेला आरोप स्वतः त्यांनीही मान्य केला होतो आणि त्यांच्या लेखणावरून सिद्ध होत होता.

गुरू शिष्यासंबंधावरून ठेवलेला आरोप मात्र सिद्ध होत नव्हता कारण माझी शिष्याशाखा नाही असे त्यांनी स्वतः सांगितले आहे. परंपरागत स्वरूपाच्या गरूशिष्या संबंधाचा त्यांनी अनेक मार्गानी धिक्कार केल्याचे ही आपण पाहीले आहे. त्यामुळे त्यांनी कोणा ब्राम्हणाला शिष्य करण्याचा प्रश्नच निर्माण होत नव्हता परंतु एखदया ब्राम्हणेत्तराकडे ब्राम्हणांनाही आदरणीय ठरेल असे व्यक्तिमत्व व चरित्र असणे हे मंबाजी सारख्यांना सहन होण्यासाखे नव्हते शिवाय गुरूशिष्या संबंधाविषयीच तूकारामांचे उत्तुंग विचार समजव्यचीही मंबाजी वैगेरेची योग्यता नव्हती स्वतःच्या आवाक्यानुसार त्यांनी त्या घटनेचा अर्थ लावला.

त्यांच्यावर ठेवण्यात आलेला तिसरा आरोप म्हणजे तुकाराम धर्माविषयी जे विचार मांडत होते त्यामुळे समाजाच्या सर्व थरातील असंख्य लोकांची मने भारावून गेली होंती. धर्मा विष्ययाची एक ताजा,निकोप आणि प्रसन्न प्रवाह प्रकट झाल्याने त्यांना जाणवू लागले होते याचा परिणाम म्हणून काही ब्राम्हण व्यक्तीही तुकारामाच्या भजन किर्तनाला हजर राहू लागली तसेच त्यांच्या पायाही पडू लागले. परंतु ब्राम्हणानी शुद्राच्या पाया पडणे ही गोष्ट ब्राम्हणांना कमीपणा आणाणारी आणि बुडवणारी आहे असे इतर काही ब्राम्हणांनी मानले आणि त्यातून तुकारामांच्या विरोधात एक मोठा संघर्ष उभा राहीला. धर्मशास्त्रांच्या आधारे तुकारामांवर भरण्यात आलेल्या खटला न्यायालयाने शिस्तीनुसार असेलच असे म्हणता येत नाही.

तुकारामांनी घेतलेल्या भूमिकेमुळे ते वैदिक पंडिताच्या डोळयात सलत होते ही या बाबतीत सर्वात महत्वाची गोष्ट होय. त्यामुळे काहीही करून त्यांना धडा शिकवायचा असे त्या पंडितानी योजले असणारे तसे करण्यासाठी न्यायालयात खेचने हा मार्ग होता पण त्या मार्गाचा अवलंब करताना न्यायालयाची शिस्त काटेकोरपणे पाळण्याची गरज नव्हती तुकारामा विरूद्ध आपण उचलेले पाऊल द्वेषपोटी उचलेले नसून धर्माच्या व न्यायाच्या आधारे उचलले आहे एवढे लोकांना दाखवता येण्यापूरता बनान करणे पुरेसे होते. प्रत्यक्षात तसे काही तरी केले तुकारामाविरूद्ध फिर्याद केली ती रामेश्वर भट्टाने आणि त्यांना गावातून हाकलून देण्याचा आदेश पाटलास दिली तोही त्यानेच शिवाय तुकारामांना गाथा बुडविण्याची आज्ञा दिली तीही त्यानेच सगळे न्यायलयीन प्रक्रियेला धरून झाले असे नाही कारण येथे एकच व्यक्ती फिर्यादीही आणि न्यायाधीशही म्हणून वावरताना दिसते. अर्थात हा खटला धर्मशास्त्रांच्या आधारे न्यायालयीन प्रक्रियेला धरून चालवला गेला असता तरी निकालात काली फरक पडला असता असे नाही कारण मुळात धर्मशास्त्रांची भूमिकाच पक्षपाती होती त्यांचे धर्मविरोधी गुन्हे ज्या कृतीतून व्यक्त झाले ती कृती म्हणजे अभंग रचना त्यामुळे अभंग पाण्यात बुडविले ही ऐकपायाभूत शिक्षा देण्यात आली. त्याखेरीज संपत्ती जप्त शिक्षा देण्यात आली आणि गावातून हकालपट्टी करणे या आणखी तीन शिक्षा ठोठावण्यात आल्या आपल्याला दिवाणात खेचण्यात आले असे तुकारांनी काही अभंगातून स्वतःच सांगितले आहे.

अशा काही अभंगाचा आाशय लेखकांनी दिला आहे.

आता काय खावे ? कोणीकडे जावे ? गावात कुणाच्या बळावर रहावे ? पाटील कोपलेला आहे गावचे हे लोक कोपलेले आहे आता मला भीक तरी कोण घालेल आता यानेचव सांडली असे म्हणतात. दिवाण्यात, न्यायालयात निवाडा करतात भत्या लोकांना ही गोष्ट सांगितली माझा दुर्बळाचा घात केला आता याचा संगत योग्य नव्हे, आता विठ्ठलाला शोधत जाऊ.

तुकारामांनी या अभंगातून स्वतःच मांडलेली आपली व्यथा पाहीली असता

त्यांचे किती हाल करण्यात आले हे स्पष्ट होते हे हाल त्यांच्या व्यवहारशून्यातेमुळे वा संन्यस्त वृत्तीमुळे झालेले नाही. हे हाल त्यांनी धार्मिक क्षेत्रात घेतलेल्या विद्रोही भूमिकेमुळे झाले आहे. यात काहीही शंका नाही. कोणत्याही क्षेत्रातील स्वतंत्र्यांसाठी युद्ध पुकारणाऱ्या कोणाही स्वातंत्र्य योद्धयांच्या वाटयाला जे येते तेथे त्यांच्या वाटयाला आले त्या स्वातंत्र्याद्धांचे संसार जसे उध्वस्त होतात तसाच तुकारामाचाही संसार उध्वस्त झाला.

जप्तीच्या नावाखाली घराची लूट बहिष्कार आणि हकलपट्‌टी या शिक्षा तुकारामांना आर्थिक दृष्या, व्यवहारिक दृष्या उध्वस्त करणात्त्या होत्या पण अभंग बुडवण्याची शिक्षा मात्र त्यांच्या अस्तित्वाचा गाभ्यावरच घाला घालणारी होती त्यांच्या प्रतिभेचे आणि विवेकाचे अत्यंत मधुर आणि परिपक्व फळ नष्ट करणारी होती. ती समाजाचीही फार मोठी हानी होती असे सांगून लेखक म्हणतात त्यांच्या अभंगाची गाथा बुडविली जाणे म्हणजे त्यांच्या ह्मदयाचा लचका तोडण्याचा प्रकार होता. तुकारामांना नामोहरम करायचे त्यांचा आवाज पूर्णपणे बंद करायचा, त्यांच्या पाखंडीपणला मुठमाती दयावयाची असा हा प्रयत्न होता शिवाय इतरांच्याही मनात धडकी भरावी आणि तुकारामांचे अनुकरण करण्याचे साहस न करण्यास निर्धार त्यांनी करावा असा इशारा या सर्व प्रकारातून लोकांनाही देण्यात आला होता आनंदाने हुरूळून गेलेल्या पंडितावर त्यांचा डाव उलटविण्यासाठी तुकारांमानी एक जबरदस्त शस्त्र बाहेर काढले ते शस्त्र सत्याग्रहाचे होते. ते अन्न वर्ज्य करून इंद्रायणीच्या काठी किमान तेरा दिवस बसले त्यांचा हा सत्याग्रह हे एकीकडून वैदिक पंडिताना जबरदस्त आव्हान होते तर दुसरीकडून सर्वसामान्य लोकांना न्यायाच्या बाजुने उभे राहण्याचे उत्कट आवाहन होते. या शिक्षेच्या प्रसंगात प्रारंभी ते मनुष्य म्हणून देहूमध्ये जरूर एकाकी पडले होते परंतु त्यांचे आचरण त्यांची नैतिकता हे त्यांचे फार मोठे पाठबळ होते सर्वसामान्य लोक त्यांच्या बाजुने उभे राहण्याचे धैर्य दाखवू शकत नसले तरी त्या लोकांच्या मनात यांच्याबद्‌दल अधार प्रेम होते. दांडगा विश्वास होता. तुकारामांच्या सत्याग्रहामुळे या प्रेमाला उधाण आले.

भरती आली आणि त्या भरतीमध्ये वैदिक पंडितांनी केलेल्या शिक्षा त्यांच्या अहंकारासह वाहुन गेल्या त्यांच्या उपोषणाचा एक दिवस जसा पुढे सरकला तसतसे सर्वसामान्य लोकांचे धैर्य वाढत गेले भीती मोडत गेली. माणूसकीच्या रक्षणासाठी झोकून देण्याची प्रेरणा वाढत गेली ज्याने आपली कर्जे माफ केली, ज्याने कसलीही दक्षिणा न घेता आपल्या कल्याणाचा उपदेश केला, ज्याने आपल्या मुलाबाळा पेक्षाही आधिक प्रेम केले, ज्याने आपल्या साठी स्वतःवर संकट ओढवून घेतली त्याचे सर्वस्व लूटले जात असताना आपण भेकडपणने घरात बसून राहणे हे माणूस म्हणून आपल्याला लांच्छनासाद आहे. लाजिरवाणे आहे, अशी भावना त्या लोकांच्या मनात उफाळून येवू लागली आणि क्रमाक्रमाने भिंतीआड कुजबुजणारे हे लोक बाहेर पडले त्याचां आवाज वाढत गेला. त्यांचा सनुदाय बनला ते तुकारामाभोवती जमले त्यांचा जयजयकार करू लागले त्यांच्या रक्षाणासाठी तथाकथित कायदा झुगारून त्याला धाब्यावर बसविण्याची त्यांनी तयारी दाखविली

लोकांच्या या पावित्र्यामुळे पंडिताना झुकावे लागले त्यांना शिक्षेच्या अंमल बजावणीचा दुराग्रह सोडून दयावा लागला.

तुकारामानी सत्याग्रहाचा शास्त्र वापरून पंडिताना निष्प्रभ केले माघार घ्यायला भाग पाडले

या प्रसंगात ज्यांची फजिती झाली ते लोक दुखावले गेले आणि त्यांना आपल्या उदद्यदीष्टांच्या पुर्तीसाठी कंबर कसली.

दुसऱ्या बाजुला तुकारामानीही शरणागती पत्करली नाही माघार घेतली नाही ज्या कार्याचा ध्यास घेतला होता ते कार्य तो निर्मळ मनाने लोकांवरील उत्कट प्रेमाने आणि निर्धाराने करत राहीले

तुकाराम इश्वराची अत्यंत उत्कट भक्ती करणारे संत होते यात मुळीच शंका नाही असे असले तरी त्यांची इश्वराविषयीची कल्पना परंपरागत स्वरूपाची वा चाकोरीबद्ध नव्हती हे आपण आवर्जुन समजावून घेतले पाहीजे. इश्वरा विषयीच्या त्यांच्या धारणा मानवाला एका अत्युंच्य पातळीवर घेवून जाणाऱ्या होत्या त्यांच्या

दृष्टीने जीवनाचा खडतर प्रवासकरणाचा सर्वसामान्य माणसाला जेव्हा प्रत्यक्षात कोणाचाच आणि कोणताच आधार मिळत नसतो तेव्हा त्यांच्या मनाला बळ देण्यासाठी इश्वराचा आधार उपयोगी पडतो आणि म्हणूनच त्यांच्या दष्टीने इश्वर हा मित्र व सखा बनतो त्याबरोबर इश्वर हा काही पाषाणाच्या धातूच्या मूर्तीत असत नाही तो माणसांच्या मनातील शुद्ध भावनेच्या स्वरूपात असतो म्हणून इश्वराविषयीच्या शुद्र व भ्रमक धारणामधून माणसाने मुक्त झाले पाहीजे असे तुकारामाना वाटत होते. इश्वराचे बळ त्याना आवश्यक वाटत असले तरी इश्वरावर अवलंबून विसंबुन देववादी बनणे मात्र त्यांना मान्य नव्हते. इश्वराविषयीचे त्यांचे हे चिंतन फार महत्वाचे आहे.

तुकारामाचा मृत्यु समजावून घेवू

एखाद्या व्यक्तिच्या मोठेपणाचे मुल्यमापन करायचे असेल तर ती व्यक्ती जगली कशी हे पाहणे जसे महत्वाचे असते तसेच ती व्यक्ति मृत्युला कशी सामोरी गेली हे ही पाहणे आवश्यक असते.

सॉक्रेटीस येशूख्रिस्त, अब्राहम लिंकन, भगतसिंग, इ. महापुरूषांनी ज्या मृल्यांसाठी व ध्येयांसाठी मृत्यु पत्करला ती ध्येये व मुल्ये त्यांना एका उच्च व उदात्त पातळीवर घेवून जातात यात शंका नाही त्यांनी ज्या धैर्याने व ज्या पद्धतीने मरणाचे स्वागत केले. ते धैर्य व ती पद्धत त्यांच्या माहात्म्याला आधिकच तेजोवलयांकित करते हे स्पष्ट आहे.

स्वाभाविकच तुकारामाच्या चरित्राचा कस तपासायाचा असेल तर त्यांच्या मुत्युचाही अर्थ नीट समजून घेणे आवश्यक आहे.

खरा मोठेपणा कशात?

वस्तुतः तुकारामाचे खरे मोठेपण त्यांच्या सदेह वैकुठ गमनामध्ये नाही हे आपण आवर्जून ध्यानात घेतले पाहीजे त्यांचे मोठेपणा त्यांच्या कार्यात त्यांच्या विचारात त्यांच्या आचरणात आहे. विशिष्ठ मुल्यांसाठी त्यांनी जो संघर्ष केला छळ सोसला त्यामध्ये आहे. त्यांचे या प्रकारचे मोठेपण कोणी नाकारले तर जरूर संताप

यावा पण संदेह वैकुठगमन नाकारले म्हणून संतापण्याचे कारण नाही ते नाकारल्यामुळे तुकारामांना कमीपणा येतो किंवा त्यांच्या मोठेपणाला गालबोट लागते असे मुळीच नाही. तुकारामांनी इंद्रायणीमध्ये कर्जखते बुडवून एक विलक्षण सामाजिक पाउल उचललेले होते. खरे तर ज्यांनी उभ्या महाराष्ट्रापासूनही अत्यंत अर्थपूर्ण घटना लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला त्यांचा संताप यायला हवा.

तुकाराम असाहय लाचार होवून इश्वर भक्तीकडे वळले अशी चरित्रे ज्यांनी लिहीली त्यांचा संताप यायला हवा. ! तुकारामांना छळणाऱ्या त्यांची विटंबना करणाऱ्या परंपरेचा जे गौरव करतात त्यांचा संताप यायला हवा ! अशा अनेक गोष्टी आहेत ज्याला सत्याचा आधार नाही अशा गोष्टींचा संताप यावा.

## तुकारामांचा मुत्यु

तुकारामांचा मृत्यूविषयी आपल्यापुढे आलेल्या सर्व माहितीचे निःपक्षपाती विश्लेषण केले असता त्यांच्या मृत्युचे स्वरूप आपल्या पुढे नीट उलगडू लागते असे लेखक आ. ह. साळुंखे यांना वाटते. वेगवेगळया लेखकांनी त्यांच्या मृत्यंची जी विविध कारणे दिली आहेत त्यापैकी फक्त एका कारणाभोवती आपले मन घुटमळु लागते. यातही शंका नाही त्यांचा मुत्यु नैसर्गिक नव्हता आणि अलौकिकही नव्हता तो आत्महत्येमुळे घडला नव्हता की अपघातही स्वरूपाचा नव्हता तो निःसंशयपणे घातपाती स्वरूपाचा होता हा घातपात नेमका कोणत्या व्यक्तिने वा व्यक्तिनी केला होता हे ठामपणे सांगणे अवघड आहे त्या व्यक्तीची नावे शोधून काढण्याला लेखकाच्या दृष्टीने फारसे महत्व नाही कारण या मृत्युबद्दल केवळ काही व्यक्तिना दोष देवून मोकळ`होणे लेखकाला योग्य वाटत नाही. कोणा माथेफिरूने ही हत्या केली, एवढाच या घटनेचा अर्थ नाही तुकारामांनी जी व्यवस्था, बदलण्यासाठी जिवाच्या आकांताने लढाई केली त्या व्यवस्थेतच त्यांच्या मृत्युची बीजे होती. तुकारामाचा मृत्यु घडवून आणण्याचे कृत्य धर्मशास्त्राच्या दृष्टीने नैतिक आणि बेकायदेशीर ठरत होते हे पाहील्यावर त्या धर्मशास्त्रांचा आधार घेण्याचा मोह काही

लोकांना होणे स्वाभाविक होते याचा अर्थ त्या व्यक्तिंचा काहीच दोष नाही असे नव्हे पण खरा दोष मूलभूत व्यवस्थेचा धर्मशास्त्रांचा रूढीचा तत्वज्ञानाचा आहे. चार्तुवण्य व्यवस्थेवर समाज उभा करायचा आणि शुद्रांचे सर्व अधिकार छाटून त्यांना गुलाम बनवायचे असे करणाऱ्या यंत्रणेचा आहे. ही व्यवस्था मोडू पाहणाऱ्या तुकारामासारख्यांना मोडून काढण्याचा प्रयत्न व्यवस्थेचे काही वारसदार करतील यात आश्चर्य नाही.

आ. ह. साळुंखे यांनी तुकारामाच्या मृत्यूचे विश्लेषण करण्यामागची भूमिका म्हणजे या विश्लेषणाद्वारे कोणा व्यक्तीविषयी व समुहाविषयी संताप निर्माण करणे वा द्वेषाचे विष पेरणे हा हेतु अजिबात नाही. पण ज्या धर्मशास्त्रीय व्यवस्थेमुळे तुकारामांसारखा अत्युच्य कोटीच्या प्रतिभावंताला आपल्या प्राणांसह सर्वस्व गमवावे लागले. त्या व्यवस्थेचे शुध्दीकरण आपण निदान आता तरी करावे या हेतुने हे विश्लेषण केले आहे. ज्या धर्मशास्त्रांच्या नियमांमुळे तुकारामांची ससेहोलपट झाली, तीच धर्मशास्त्रे आजही पवित्र मानायची काय ? हा प्रश्न लेखकाला उपस्थित करायचा आहे.

तात्पर्य आपण आपल्या विवेकाच्या कसोटीवर त्या धर्मशास्त्रांची डोळसपणे चिकित्सा करायला सुरवात केली तर तुकारामाचे बलिदान सार्थकी ठरले हा हेतु आ. ह. साळुंखे यांचा त्यामागचा आहे आणि तो बरोबर आहे.

तुकारामाच्या मृत्युचा वा शारिरीक हत्येचा प्रश्न बाजूला ठेवला तरी इतर मार्गांनी तुकारामांची हत्या करण्याचे अनेक प्रयत्न झाले हे आपण आवर्जुन ध्यान्यात घेतले पाहीजे.

एखाद्याच्या व्यक्तित्वाला त्याच्या पूर्ण क्षमतेपेक्षा फुलू न देणे ही देखील क्रूर हत्याच आहे म्हणूनच तुकारामांना शुद्र ठरवून त्यांचा फुलण्याचा अधिकार नाकारण्यात आला हा देखील त्यांच्या हत्येचा एक प्रयत्न मानायला हवा. अभंग बुडवणेही हीही एक हत्याच तुकारामाच्या नावावर इतर अभंग घुसडणे हे विकृतीकरण म्हणजे एक प्रकारची हत्या.

. शूद्र ज्ञानी झाला की तो ब्राम्हणाना बाधक ठरतो हे ब्राम्हणानी तुकारामांच्या बाबतीत अनुभवले, त्यामुळे त्यांनी तुकारामांच्या वेद धर्म वगैरेचा अधिकार नाकारून त्यांची नांगी छाटण्याचा प्रयत्न केला होता. तुकारामाच्या मृत्युचे विश्लेषण आ. ह. साळुंखे यांनी आज या पुस्तकात करण्याचे कारण म्हणजे या विश्लेषणाद्वारे कोणा व्यक्तिविषयी व समूहाविषयी संताप निर्माण करणे वा द्वेषाचे विष पेरणे हा हेतु अजिबात नसून ज्या धर्मशास्त्रीय व्यवस्थेमुळे तुकारामासारख्या अत्युच्य कोटीच्या प्रतिभावंताला आपल्या प्राणासह गमावावे लागते. त्या व्यवस्थेचे शुद्धीकरण आपण निदान आता तरी करावे या हुतुने हे विश्लेषण केले आहे. ज्या धर्मशास्त्राच्या नियमामुळे तुकारामाची ससेहोलपट झाली तीच धर्मशास्त्रे आजही आपली धर्मशास्त्र म्हणून पवित्र मानायची काय हा प्रश्न लेखक इथे उपस्थित करतात त्याच धर्मशास्त्रानी आजही आपल्या नैतिकतेचा आधार म्हणून आपल्या जीवनपद्धतीचे अधिष्ठान म्हणून स्वीकारायचे काय हा प्रश्न लेखक लोकांपुढे ठेवतात तात्पर्य आपण आपल्या विवेकांच्या कसोटीवर त्या धर्मशास्त्राची डोळसपणे चिकित्या करायला सुरवात केली तर तुकारामाचे बलिदान सार्थकी लागेल अशी भावना लेखक व्यक्त करतात.

अशी अनेक उदाहरणे दाखले सनातन संघर्ष यातील ताण तणाव विद्रोही तुकाराम यामध्ये आपल्याला पाहवयास मिळतात

विद्रोही तुकाराम या ग्रंथामुळे तुकारामाच्या आयुष्यात ज्या काही महत्वाच्या घटना घडल्या आहेत पण त्या काही घटना समाजापासून अंधारात आहेत त्या उजेडात आल्या आहेत. अत्यंत निर्भयेतेने या ग्रंथामुळे ओळख होते. आ. ह. साळुंखे यांनी तुकारामाचे दर्शन आम्हाला त्यांच्या लेखनातून घडवले चिंतनातून घडवले पुढील प्रकरणात विद्रोही तुकाराम व तुकाराम दर्शन मांडणीचा आपण या दोन ग्रंथाची तुलनात्मक मांडणी . पाहणार आहोत.